## महाराष्ट्र शासन
# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय गोंदिया

क्र.शावैमगों/आस्था-३/ ६९००-९० /२२ दिनांक ३०/०८/२०२२

**कार्यालयीन आदेश**

विषय:- वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित रुग्णालये तथा संस्थामधील वर्ग-३ व वर्ग-४ ची रिक्त पदे नियमीतरित्या भरेपर्यंत बाहयंत्रणेकडुन सेवा घेण्याबाबतची निविदेतील तांत्रिक लखोटा क्रं १ संदर्भात चर्चा करण्याकरिता बैठक आयोजित करणेबाबत.

संदर्भ:- १) वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र.एलईसी-१४२१/ प्र.क्र.७३/वैसेवा-४, दिनांक. १३/०४/२०२२.

२) संचालनालय, वै.शि व सं, मुंबई यांचे पत्र क्र.DMER-16040/64/2022-EST4 दिनांक निरंक/०४/२०२२

उपरोक्त संदर्भ क्र.०१ नुसार वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयमध्ये वर्ग-३ व वर्ग-४ संवर्गातील रिक्त पदे संरळसेवेने नियमितरित्या भरेपर्यंत सदर पदावर बाहययंत्रणेव्दारे सेवा उपलब्ध करुन घेण्यासाठी शासनाने या संस्थेतील महाविद्यालय व रुग्णालयातील वर्ग - ३ ची पदे बाहययंत्रणे मार्फत भरण्याबाबत मान्यता प्रदान केली आहे. संदर्भ क्र.०२ संचालनालय, वै.शि व सं, मुंबई यांच्या पत्रानुसार सदर पदे बाहयस्त्रोताने भरण्याबाबत निर्देश दिलेले आहे. त्याअनुषंगाने या संस्थेतील वर्ग - ३ (तांत्रिक व अंतात्रिक) संवर्गातील पदे बाहयस्त्रोताने भरण्याकरिता निविदा प्रसिध्द करण्यात आलेली असून यामध्ये एकुण ४ निविदाकारांनी सहभाग घेतलेला आहे. संस्थास्तरावर तांत्रिक लखोटा क्रं १ उघडण्यात आलेला असून त्यांची तपासणी केलेली आहे. सदर निविदेमध्ये सहभाग नोंदवलेला निविदाधारकांना लखोटा क्रं १ च्या कागदपत्राबाबत चर्चा करण्याकरिता बैठक दि.०६/०९/२०२२, रोजी वेळ - दुपारी ०४.०० वाजता मा. अधिष्ठाता यांच्या दालनात आयोजित केलेली आहे. तरी सर्वांनी उपस्थित राहावे.

(डॉ कुसुमाकर घोरपडे)
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया.

प्रती,

१) डॉ. नंदकिशोर जयस्वाल, वैद्यकीय अधिक्षक - सदस्य
२) डॉ. मनिष तिवारी, उप-अधिष्ठाता - सदस्य
३) श्रीमती मालती डोंगरे, अधिसेविका - सदस्य
४) श्री. गजानन तायडे, प्रशासकीय अधिकारी (रुग्णालय) - सदस्य सचिव
५) श्री.सजय भोंडे, प्रशासकीय अधिकारी (महाविद्यालय) - सदस्य सचिव

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तसेच रुग्णालय, गोंदिया

प्रत- मे. अभिजित इंटेलिजन्स सिक्युरिटी अ‍ॅन्ड लेबर सप्लायर, नागपूर
प्रत- मे. डी.एम. इन्टरप्रायसेस, नवी मुंबई
प्रत - मे.के सन्स, इलेक्ट्रानिक्स , नागपूर
प्रत- मे. पटले कॉन्ट्रटर, नागपूर.
प्रत - श्री शिवम घारड, उच्चश्रेणी लघुलेखक यांनी सदर बैठकीचे इतिवृत्त घेण्याकरिता उपस्थित राहावे